डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

# प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाट्ये, जि. रत्नागिरी

डॉ. के. व्ही. मालशे
कृषिविद्यावेत्ता

प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाट्ये,
जि. रत्नागिरी –४१५ ६१२
ई–मेल agronomistbhatye17@gmail.com

जा.क्र.प्रानासंकें/आस्था/ 973 /२०२५ दि. 18 JUL 2025

## जाहिरात

या विद्यापीठांतर्गत कार्यान्वित असलेल्या प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाट्ये या संशोधन केंद्रावर महसुल उत्पन्न वाढीचा कार्यक्रम या योजनेमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे पदे भरण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह पात्र उमेदवारांकडून दि. ०७/०८/२०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | पदाचे नाव | पदांची संख्या | आवश्यक पात्रता | एकत्रित वेतन | नेमणुकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन सहाय्यक | १ | कोणत्याही शाखेची पदवी, (CCC/O-A-B-C level, MSCIT/GECT), टायपिंग मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मी., संगणकातील MS World, Excel, Photoshop, Powerpoint मधील काम येणे आवश्यक. (या विद्यापीठ सेवेत तात्पुरत्या /रोजंदारी स्वरूपात काम करत असलेल्यांसाठी १० वर्षे किंवा त्याहून जास्त अनुभवास प्राधान्य.) | रू. १५,०००/– | ११ महिने |
| २ | प्रक्षेत्र सहाय्यक | २ | कृषि/उद्यानविद्या/वनशास्त्र/पशुविज्ञानशास्त्र/कृषि तंत्रज्ञान/कृषि अभियांत्रिकी/गृहविज्ञान/मत्स्य विज्ञान / जैवतंत्रज्ञान या विषयातून पदवी परिक्षा उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठा मधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता. तसेच (CCC/O-A-B-C level, MSCIT/GECT), (या विद्यापीठ सेवेत तात्पुरत्या /रोजंदारी स्वरूपात काम करत असलेल्यांसाठी १० वर्षे किंवा त्याहून जास्त अनुभवास प्राधान्य.) | रू. १६,०००/– | ११ महिने |
| ३ | मजूर | १ | किमान ८ वी पास, नारळ पाडप करणे, टी x डी व इतर जाती संकरीकरण करणे, तसेच जमा झालेल्या नारळांची प्रतवारी करणे, प्रायोगिक कामे करणे, निरिक्षणे घेणे, पृथ:करणाच्या कामास मदत करणे व इतर अनुषांगिक कामे. विद्यापीठात सेवेत तात्पुरत्या /रोजंदारी स्वरूपात काम करत असलेल्यांसाठी १० वर्षे किंवा त्याहून जास्त अनुभव | रू. १५,०००/– | ११ महिने |

अटी व शर्ती –

१. वयाची अट– कार्यालय सहाय्यक व प्रक्षेत्र सहाय्यक या पदांकरिता वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे. (शासन निर्णय एसआरव्ही २०१५/प.क्र. ४०४/कार्या.१२ दि. २५/०४/२०१६) परंतू या संशोधन केंद्रावर काम करणाऱ्या व २० वर्ष व त्याहून अधिक कालावधीपेक्षा काम करणाऱ्या व अनुभवी कंत्राटी मजूरांसाठी वयाची अट शिथील करण्यात आलेली आहे.

२. अर्जदाराने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये माहिती भरून कृषिविद्यावेत्ता, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, रत्नागिरी यांचे कार्यालयात दिनांक ०७/०८/२०२५ पुर्वी पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.अर्जदाराच्या लखोट्यावर प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाट्ये, रत्नागिरी – **कार्यालयीन सहाय्यक, प्रक्षेत्र सहाय्यक व मजूर** या पदासाठी अर्ज असा उल्लेख असावा.

३. पात्र उमेदवारांची निवड समितीद्वारे मुलाखत व प्रात्यक्षिकद्वारे करण्यात येईल.

४. मुलाखतीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

५. मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता देय असणार नाही.

६. निवडलेल्या उमेदवाराने रू. १०० किमतीच्या स्टॅम्प पेपरवर नियुक्ती कालावधी दरम्यान तो नोकरी सोडणार नाही आणि नेमुन दिलेले काम पूर्ण करेल आणि तो नियमित नियुक्तीसाठी दावा करणार नाही असे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

७. उमेदवाराला प्रकल्पातील नेमणुक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियमित आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

८. उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सुचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

९. उमेदवाराला अर्ज नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे आहे.

१०. निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जेथे योजना कार्यरत आहे तेथे नियुक्ती देण्यात येईल.

११. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ ०८.०० ते १७.३० अशी राहील. तथापि, एखादया दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होईपर्यंत थांबावे लागेल किंवा काम करण्यासाठी लवकर यावे लागेल

१२. सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१३. जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१४. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार संबंधितांना राहतील.

१५. सदर तात्पुरती नियुक्ती अकरा महिने कालावधीकरीता राहील. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१६. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्रं एसएलपी–५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवाराला विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

१७. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणुक रद्द होऊ शकते.

१८. कोणत्याही टपाल विलंबासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही

१९. कोणत्याही स्वरूपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरवले जाईल.

२०. लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना –अ मध्ये अर्जासोबत सादर करावे.

२१. वयाचा लाभ /फायदा उमेदवाराकडून नॉनक्रिमीलेअर/जातीचा दाखला घ्यावा आवश्यक राहील.

२२. नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

२३. जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

२४. प्रमाणपत्रे सत्यप्रतीत/स्वयंसाक्षाकीत असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक.

२५. अर्जावर उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा.

२६. याबाबतची माहिती dbskkvdapoli या विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

कृषिविद्यावेत्ता,
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,
भाट्ये, रत्नागिरी